क्रमांक:- एनओटी-३६१७/सीआर-२२/२०१७/तीन दिनांक:- १२ ऑक्टोबर, २०१७

# घोषणा

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१७ — अर्ज सादर करण्याबाबत**

जाहिरात क्रमांक १७/२०१७, दिनांक २० एप्रिल, २०१७ नुसार आयोगामार्फत दिनांक ९ जुलै, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा - २०१७ चा निकाल दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर निकालाधारे महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१७ च्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे.

**२.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या http://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **११ ऑक्टोबर, २०१७ ते २५ ऑक्टोबर, २०१७** या कालावधीतच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

ठिकाण:- मुंबई

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

TRIAL MODE − a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.